Maharashtra State Board of
Secondary & Higher Secondary Education, Pune
S.R.No.832-A, Final Pl No. 178,179, Near Balchitrawani, Behind Agharkar Research Institute, Bhamburda, Shivajinagar, Pune-411004.

महाराष्ट्र राज्य
माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे
स.न. ८३२-ए, फा.प्लॉ.नं. १७८, १७९, बालचित्रवाणी शेजारी, आघारकर रिसर्च इन्स्टिट्यूटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे ४११००४

Tel : Chairman (p) : STD . (020) 25651751 | EPABX - 25705000 Fax : 25665807 | Secretary(P) : 25651750

तातडीचे/महत्वाचे
परीक्षा प्राधान्य

क्र.रा.मं./परीक्षा-७/४७४८
पुणे - ४११ ००४
दिनांक -११/११/२०२०

प्रति,

विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
सर्व विभागीय मंडळे.

**विषय :-** नोव्हेंबर-डिसेंबर २०२० च्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) पुरवणी परीक्षेच्या ऑनलाईन प्रवेशपत्रांबाबत...

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) नोव्हेंबर-डिसेंबर २०२० साठी सर्व विभागीय मंडळातील सर्व विद्यार्थ्यांना ऑनलाईन प्रवेशपत्र उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

त्या अनुषंगाने सूचित करण्यात येते की, आपल्या विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील सर्व माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांना नोव्हेंबर-डिसेंबर २०२० च्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी)परीक्षेची प्रवेशपत्रे (Hall Ticket) ऑनलाईन (Online) पध्दतीने मंडळाच्या www.mahahsscboard.in या संकेतस्थळावर आज बुधवार दिनांक ११/११/२०२० पासून School व College login मध्ये download करण्याकरिता उपलब्ध होतील. या संदर्भात काही तांत्रिक अडचण उद्‌भवल्यास माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांनी विभागीय मंडळाकडे संपर्क साधावा व विभागीय मंडळाने व्यवस्थापक, गणकयंत्र विभाग, राज्यमंडळ यांचेशी संपर्क साधावा.

उपरोक्तनुसार आपल्या कार्यकक्षेतील सर्व माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयाच्या मुख्याध्यापक, प्राचार्यांना व विद्यार्थ्यांना याप्रमाणे अवगत करून देण्याबाबत पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी व याबाबतचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

सचिव,
राज्य मंडळ, पुणे-४

प्र.कोविमं/इ.१२वी परीक्षा/5595
कोल्हापूर ४१६००४
दिनांक १२/११/२०२०

प्रति,
प्राचार्य / मुख्याध्यापक
सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालये / शाळाप्रमुख,
सातारा, सांगली, कोल्हापूर.

इ.१०वी व १२वी नोव्हे-डिसेंबर २०२० परीक्षेची प्रवेशपत्रे मंडळाच्या संकेतस्थळावरून Online पद्धतीने उपलब्ध करून घेणेसंदर्भात, उपरोक्त सूचनांप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी. अधिक माहितीसाठी सोबत प्रकटन जोडले आहे.

विभागीय सचिव
म.रा.माध्य. व उच्च माध्य. शिक्षण मंडळ,

12/11/2020

# प्रकटन

उच्च माध्यमिक (इयत्ता १२ वी ) नोव्हेंबर-डिसेंबर २०२० च्या परीक्षेस प्रविष्ठ होणा-या सर्व विद्यार्थ्यांची प्रवेशपत्रे (Hall Ticket) ऑनलाईन पध्दतीने उपलब्ध होणार असून, त्यासंदर्भात कनिष्ठ महाविद्यालयानी पुढीलप्रमाणे कार्यवाही करावयाची आहे.

१) नोव्हेंबर-डिसेंबर २०२० इयत्ता १२ वी परीक्षेसाठी ऑनलाईन आवेदनपत्र सादर केलेल्या सर्व विद्यार्थ्यांची प्रवेशपत्रे (Hall Ticket बुधवार **दिनांक ११.११.२०२०** पासून मंडळाच्या **www.mahahsscboard.in** या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येत आहेत. प्रवेशपत्रे college login मध्ये download करावयाची आहेत

२) नोव्हेंबर-डिसेंबर २०२० इयत्ता १२ वी परीक्षेसाठी ऑनलाईनआवेदनपत्र सादर केलेल्या सर्व विद्यार्थ्यांची प्रवेशपत्रे (Hall Ticket ) ऑनलाईन प्रिंट काढून विद्यार्थ्यांना द्यावयाची आहेत.

३) प्रवेशपत्राची (Hall Ticket ) ऑनलाईन प्रिंटींग करताना प्रिंट साठी विद्यार्थ्यांकडून कोणतेही वेगळे शुल्क घेऊ नये.

४) प्रवेशपत्राची (Hall Ticket ) ऑनलाईन प्रिंट काढलेनंतर त्यावर प्राचार्यांनी शिक्का मारुन सही करावयाची आहे.

५) प्रवेशपत्रामध्ये (Hall Ticket ) विषय व विषयाचे माध्यम इ. मध्ये दुरुस्त्या असतील तर कनिष्ठ महाविद्यालयानी तातडीने या कार्यालयात येवून दुरुस्ती करुन घ्यावयाची आहे. जेणेकरुन परीक्षा केंद्रावर वेळेत प्रश्नपत्रिका पुरविणे शक्य होईल.

**६) प्रवेशपत्रावर विद्यार्थ्यांचा फोटो प्रिंट झाला नसेल अथवा प्रवेशपत्रावर (Hall Ticket ) विद्यार्थ्याचा चूकीचा फोटो असल्यास प्रवेशपत्रावर त्या विद्यार्थ्यांचा फोटो चिकटवून त्यावर प्राचार्यांनी सही शिक्क्यासह प्रमाणित करणे आवश्यक आहे.तसेच त्या प्रवेशपत्राची एक प्रत परीक्षा केंद्रावर आणि एक प्रत या कार्यालयाकडे पाठविण्यात यावी. अशा विद्यार्थ्यांनी परीक्षा केंद्रावर ओळखीचा पुरावा म्हणून त्याचे महाविद्यालयीन ओळखपत्र किंवा आधारकार्ड इ. सोबत ठेवणे आवश्यक राहील. तशी सूचना त्या संबंधित विद्यार्थ्यांना देण्यात यावी.**

७) प्रवेशपत्रामध्ये (Hall Ticket ) मध्ये विद्यार्थ्यांच्या नावांत,जन्मतारखेत तसेच विद्यार्थ्याचा फोटो, स्वाक्षरी इ. दुरुस्त्या असतील तर अशा दुरुस्त्या कनिष्ठ महाविद्यालय स्तरावर करुन एक प्रत तातडीने या कार्यालयास सादर करावयाची आहे.

८) विद्यार्थ्याकडून प्रवेशपत्र (Hall Ticket ) गहाळ झाल्यास कनिष्ठ महाविद्यालय स्तरावर पुन:श्च प्रिंट काढून त्यावर लाल शाईने द्वितीयप्रत (Duplicate ) असा शेरा देऊन प्रवेशपत्र द्यावयाचे आहे.

९) ज्या विद्यार्थ्यांचे No Candidate साठी मंडळाकडे प्रस्ताव सादर केले आहेत अशा विद्यार्थ्यांची प्रवेशपत्रे (Hall Ticket ) कोणत्याही परिस्थितीत संबंधित विद्यार्थ्यांस दिली जाणार नाहीत याची कनिष्ठ महाविद्यालयांनी दक्षता घ्यावयाची आहे.

विद्यार्थ्यांच्या ऑनलाईन प्रवेशपत्रांबाबत ( Hall Ticket ) वरीलप्रमाणे कार्यवाही करावी. त्यासंदर्भात काही तांत्रिक अडचण उदभवल्यास तातडीने या कार्यालयाशी संपर्क साधावा.

विभागीय सचिव
म.रा.माध्य. व उच्च माध्य. शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर-४१६००४.